MHAU060006602022

## नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०२२ मधील नि.क्र.११ खालील आदेश
## छायाबाई महादु धोतरे विरुध्द साहेबराव लक्ष्मणराव दापके

१. प्रतिवादी यांनी सदर अर्ज त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला १८ दिवसांचा विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे म्हणणे की, प्रतिवादींच्या विधीज्ञांची आत्या मयत झाल्यामुळे त्यांना मुदतीत लेखी कैफियत दाखल करता आले नाही. त्यामुळे सदर लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जास वादींनी अर्जाच्या मागील बाजुस म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज हा कायदेशीर नसुन तो कायदयानुसार चालु शकत नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा हा अतिक्रमण काढुन ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ व ३ यांना समन्सची बजावणी होउन दिनांक २९.०६.२०२२ रोजी ते वकीलांमार्फत हजर झाले. सदर दाव्यात प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दाखल करणे बंधनकारक होते. परंतु प्रतिवादी यांनी अर्जात कथन केलेली कारणे संयुक्तिक आहेत. सदर कारणांचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, सदर प्रतिवादींना त्याच्या बचावाची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रतिवादी यांचा नि.क्र ११ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2022.11.09 13:03:48 +0530

**(अ. ई. आवटी)**

दिनांक– ०९.११.२०२२

सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (कोर्ट न.२)
कन्नड

# **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. S. Takalkar |
| Court | : | A.I. Awati<br>Jt.C.J.J.D. & J.M.F.C, Kannad. |
| Date | : | 09.11.2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 09.11.2022 |
| Order uploaded on | : | 09.11.2022 |
| Order is digitally signed on | : | 09.11.2022 |